श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ८ वें ] [ भाद्रपद

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवितमतिशयचपलम् ।



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ।

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

## अनुक्रमणिका.


पुण्यतिथि उत्सव आणि उत्सवाचा कार्यक्रम ... ...
अनुभव ... ... ... ... ... ...
संक्रांतीचा हलवा... ... ... ... ...
अनुभव ... ... ... ... ... ...
अर्वाचीन-भक्तलीलामृत ( अध्याय ३२ आणि ३३ ) ...
डिस्ट्रिक्ट जज्जांच्या कोर्टातील सिव्हिल सुट ...
ता. १६-८-३१ रोजीं सांताक्रूझ येथें भरलेल्या
कमिटीच्या सभेंतील कांहीं ठरावांचा उतारा ...


## विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची " यशो... टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. ...

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें ... किं. रु. २--८--०.

**रा. आ. तर्खड.**
व्यवस्थापक—**श्रीसाईलीला ...**

### श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचे ... पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड.**
—प्रकाशक.

॥ श्रीसाईबाबा प्रसन्न ॥

# पुन्यतिथि उत्सव

कृ. सा. न. वि. वि. श्री समर्थ सद्गुरु साईमहाराज यांची पुण्यतिथि आश्विन शु. १० बुधवार शके १८५३ ता. २१-१०-३१ रोजीं क्षेत्र शिर्डी येथें महाराजांच्या मंदिरांत होणार आहे. तरी या समयीं आपण कृपा करून आपल्या कुटुंबांतील बाळगोपाळांसह व मित्रमंडळीसह तीर्थ-प्रसादास अवश्य यावें अशी नम्र विनंती आहे.

सदर्हू कार्यासाठीं वर्गणी पाठविणें असल्यास ती खालीं दर्शविलेल्या कोणत्याही सद्गृहस्थांकडे पाठविण्याची कृपा व्हावी.

१ श्रीयुत रा. आ. तर्खड ऑ. खजिनदार १० जर मॅन्शन वांद्रें.

२ श्रीयुत सुंदरराव दि. नवलकर ऑ. चिटणीस १४१ साईभुवन ...रद स्ट्रीट मुंबई नं. २

३ रावसाहेब. बा. वि. देव. ५२ स्टेशन रोड ठाणें.

४ श्रीयुत बापुराव राघवजी बोरावके ऑ. दुय्यम चिटणीस शिर्डी.
ता. कोपरगांव. जि. नगर.

आपले आज्ञांकित

**मोरेश्वर विश्वनाथ प्रधान**
**बाळकृष्ण विश्वनाथ देव**
**तात्याजी गणपत पाटील कोते**
**सखाराम बळवंत घुमाळ**
**वासुदेव नारायण चांदोरकर**
श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानचे ट्रस्टी.

# उत्सवाचा कार्यक्रम.

**ता. २१-१०-३१** आश्विन शु १० बुधवार

सकाळीं:—संस्थानचा रुद्राभिषेक व पवमानाभिषेक मंगळस्नान, व आरती व विधियुक्त पुण्यतिथिश्राद्ध.

दुपारीं:—प्रसाद, पुराण व कीर्तन.

रात्रौ:—भजन, रथाची मिरवणूक.

**ता. २२-१०-३१** आश्विन शु० ११ गुरुवार

सकाळीं:— संस्थानचा अभिषेक, स्नान, पूजा व आरती

दुपारीं:— फराळ किंवा भोजन व पुराण.

रात्रौ:— भजन, पालखी व चावडी.

**ता. २३-१०-३१** आश्विन शु० १२ शुक्रवार

सकाळीं:— काल्याचें कीर्तन

दुपारीं:— पुराण. नंतर ग्रामभोजन.

ॐ

## श्री सच्चिदानंद सद्गुरु साईबाबा प्रसन्न.

# अनुभव

श्रीयुत बाबासाहेब तर्खड साईलीला कर्ते यांस,—

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष. श्री बाबांच्या कृपेनें आपण अविश्रांत श्रमानें चालविलेल्या श्री साईलीला मासिकांत आणखी कांहीं अनुभव द्यावे अशी श्री सद्गुरु माउलीनें स्फूर्ति दिल्यावरून आपणाकडे साईलीलेंत देणेंकरितां खालील अनुभव पाठवीत आहे, तरी त्यांतून जे आपणास छापण्यास योग्य वाटतील ते घ्यावे अशी विनंती आहे.

(१) माझे मेहुणे रा. रा. शि. भि. मोहिले यांच्या मुलीचा वरचा ओंठ जन्मतांच दुभंग झालेला होता. व त्यामुळें दिसण्यांत वाईट दिसत असे. डॉक्टरी उपायानें तो बरा होण्यासारखा नव्हता. बरा झाला तर सत्पुरुषाच्या कृपेनेंच बरा होईल असें त्यांस वाटल्यावरून ते सन १९१३ सालीं डिसेंबर महिन्यांत ( मार्गशीर्ष महिना ) आपल्या मंडळीस घेऊन श्रीसद्गुरु समर्थ साईबाबांच्या दर्शनाकरितां शिरडीस गेले. तेथें गेल्यानंतर श्रींच्या दर्शनाकरितां गेले. त्यांना पाहातांच श्री बाबा म्हणाले, "तुम्ही येथें कां आलेत तें मी समजलों. मी मुलीला बरी करीन; परंतु त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. मुली देवमाणूस असून अल्पायुषी आहे. माघ महिन्यांत शुद्ध चतुर्थीला तिचा मृत्यु आहे व त्या दिवशीं तूं घरीं नसशील, तुला ऑफिसांत जावें लागेल, तिची व तुझी भेट होणार नाहीं." त्याप्रमाणें माघ शुद्ध चतुर्थीला दोन प्रहरीं मुलीला देवाज्ञा झाली. तो दिवस त्यांच्या लक्षांत असतांना त्या दिवशीं त्यांना ऑफिसांत जाणें भाग पडलें, व ऑफिसांतून घरीं येण्यासही नेहमींपेक्षां थोडा उशीर झाला. घरीं आल्यानंतर त्यांना मुलीची हकीकत कळली. म्हणजे श्री सद्गुरु माउलीनें म्हटल्याप्रमाणें शब्दशः खरें झालें. काय हें त्रिकाल ज्ञान ! ही हकीकत माझ्या मेहुण्यांच्या सांगण्यावरून लिहिली आहे.

(२) माझा धाकटा बंधु गांवीं असतांना त्याच्या हातास चवडा निघा हात बराच सुजला व दुखूं लागला. गांवीं असतांना त्यानें बरेच उपाय केले. वैद्यास दाखवितां त्यानें सांगितल्याप्रमाणें इलाज केले; परंतु कशानेंही कांहीं गुण येईना. शेवटीं तो अंधेरीस आमच्या बिऱ्हाडीं आला. डॉक्टरांस वगैरे दाखवितां त्यांनीं ऑपरेशन करावें लागेल असें सांगितलें. ऑपरेशन करण्यास आम्हांस धैर्य होईना, व त्याला अतिशय त्रास होऊं लागला. सरते शेवटीं श्रीबाबांची उदी लावावी असें माझ्या मनांत आलें, व वडील बंधूस त्याप्रमाणें सांगितलें. त्या दिवशीं रात्रीं उदी पाण्यांत कालवून लाविली. उदी लाविल्यानंतर हातास ठणका उठल्या व सर्व रात्र त्याला झोंप लागली नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तें फुटलें नाहीं असें पाहून वडील बंधूस त्यास डॉक्टरकडे नेण्यास सांगितलें. परंतु वडील बंधु म्हणाला कीं, पुन्हां एकदां उदी लावून पाहातों व दोन-प्रहरपर्यंत न फुटल्यास डॉक्टरकडे घेऊन जातों. दोन प्रहरपर्यंत फुटलें नाहीं असें पाहून वडील बंधूनें धाकटया बंधूस "हात धुव, डॉक्टरकडे जाऊं" असें सांगितलें. त्याप्रमाणें धाकटा बंधु हात धुत असतां दर्द एकाएकीं फुटलें व वाहूं लागलें, व थोडया दिवसांनीं बरें झालें. हा सर्व उदीचा प्रभाव.

(३) सन १९२५ सालीं आषाढ शुद्ध १० तारीख १ जून रोजीं ऑ॰ सांतून पगार झाला होता व कांहीं उसनवार घेतलेले पैसे मित्रांनीं परत दिले होते. म्हणजे अजमासें १४० रुपये खिशांत होते. दुसऱ्या दिवशीं आषाढी एकादशी होती. त्या दिवशीं श्रीविष्णूला सहस्र तुळशी वहावयाच्या होत्या, म्हणून ठाकुरद्वारवरून भुलेश्वराकडे तुळशी व फराळाचें सामान घेण्याकरितां श्री भुलेश्वराकडे जात होतों. वाटेंत विद्यारामभाईच्या वाडींतील श्रीदत्त मंदीराजवळ रा. रा. कारखानीस यांचें तयार फोटोचें व फ्रेम बसविण्याचें दुकान होतें, त्यांच्या दुकानांत गेलों व श्री अक्कलकोट स्वामींचा फोटो घेतला. तथेंच श्री बाबांच्या मोठया साईजची छबी दृष्टीस पडली. छबी मनांत फार भरली. मालक दुकानांत नव्हता. नोकरास छबीची किंमत विचारितां त्यानें पंचवीस रुपये सांगितले. किंमत कांहीं कमी करितां येईल काय असें मी त्यास

विचारिलें, तो म्हणाला, नाहीं. तर मग किंमत जास्त आहे, पुढें पाहूं, असें म्हणून तुळशी घेण्याकरितां भुलेश्वरीं गेलों. तुळशी व फराळाचें सामान घेऊन अंधेरीस घरीं जाण्याकरितां चर्नीरोड स्टेशनवर आलों. स्टेशनवर आल्यानंतर पैशाचें पाकीट पाहाण्याकरितां खिशांत हात घातला. हात घालतांच पाहातों तों खिशांत पाकीट नाहीं. एकदम दचकलों आणि स्टेशनवरून परत त्या ठिकाणीं गेलों व पाकीटाचा शोध केला; परंतु पाकीट कांहीं मिळालें नाहीं. श्रीबाबांची छबी घेतली असती तर बरें झालें असतें असें वाटलें व तसाच घरीं अंधेरीस परत गेलों. मात्र मनात तीच छबी घेण्याचा निश्चय केला. पुढें दोन महिन्यांनीं ती छबी घेण्याकरितां त्या दुकानीं गेलों. त्यांत ती छबी होती. मालकाला ती छबी मजला पाहिजे असें मीं सांगितलें. तो म्हणाला, ती छबी मी दुसऱ्यास देऊं केली आहे व तो आज उद्यां इतक्यांत घेण्याकरितां येईल. मी तुम्हास पाहिजे असल्यास दुसरी देईन. नंतर मी त्यास मागें घड-लेली हकीकत सांगितली व म्हणालों, तुम्हीं वाटेल तें करा, ही छबी मला पाहिजे. तुम्हांस वाटेल ती किंमत घ्या.शेवटीं हो ना करितां करितां मालक छबी देण्यास कबूल झाला. मी पुन्हा म्हणालों, किंमत तुम्ही मागाल ती मी देण्यास तयार आहे. परंतु माझ्या मनांत त्यानें तेरा रुपये घ्यावे असें आलें. मालकानें फार विचार केल्यानंतर तेरा रुपये द्या असें म्हणाला. हें ऐकून मला फारच आनंद झाला व म्हणालों, मीही मनांत तेरा रुपयेच धरले होते. दोघांचा आंकडा जमला. पैसे देऊन श्रीसद्गुरु माउलीची छबी घरीं घेऊन गेलों व श्रींच्या लीलेचें अत्यंत कौतुक वाटलें.

(४) माझें कुटुंब सन १९२५।२६ सालीं क्षयरोगाचे आजारानें जवळ जवळ १० महिने सीक होतें. बऱ्याच डॉक्टरवैद्यांचे उपाय केले. चांगल्या हवेवर बिऱ्हाड करून पाहिलें; परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेरीस चैत्र महिन्यांत श्रीरामनवमीच्या उत्सवाच्या वेळीं सर्व मंडळीला घेऊन श्रीसद्गुरु माउली बाबांच्या समाधीच्या दर्शनाकरितां श्रीक्षेत्र शिर्डी येथ गेलों. तेथे गेल्यानंतर माझ्या कुटुंबाला बराच आराम वाटला, व चांगली हुशारी वाटली.

ऑफिसांतील रजेच्या अभावामुळें तेथें फक्त चार दिवस राहिलों. नंतर अंधेरीस बिऱ्हाडीं परत आलों घरीं आल्यानंतर थोडे दिवस तब्येत बरी होती; परंतु पुन्हा पूर्ववत् प्रकृति बिघडली. इतक्यांत एके दिवशीं दोनप्रहरीं कुटुंब झोपेच्या गुंगींत असतां तिच्या स्वप्नांत श्रीसद्गुरु माउली आली व ‘भिऊं नको, तूं बरी होशील’ असें आश्वासन दिलें. पुढें घरांत करण्याची अडचण पडल्यामुळें कुटुंबाला माहेरीं पोचविण्याचा विचार केला. इतक्यांत अंधेरीचे डॉक्टर पाटील कलकत्त्याहून दांताच्या परीक्षेंत उत्तीर्ण होऊन एक वर्षानीं घरीं आले. त्यांचा माझ्यावर बराच लोभ असल्यामुळें त्यांस मी भेटावयास पाहिजे होतें, परंतु घरच्या ह्या अडचणीमुळें मजला त्यांस भेटतां आलें नाहीं, म्हणून ते स्वतः माझ्या घरीं आले. त्यांना न भेटण्याचें कारण मी सांगितलें आणि म्हणालों, मी उद्यां कुटुंबाला माहेरीं पोचवितों. त्यांनीं कुटुंबाची प्रकृति पाहिली व म्हणाले, उद्यांच मंडळीला न पाठवितां एक आठवडा मी औषध देतों व तितक्यांत गुण न आल्यास पुढें काय करावयाचें तें सांगेन. त्याप्रमाणें औषध दिलें. औषध देतांच लागू पडलें. व पंधरा दिवसांत अजमासें दहा पौंड, वजन वाढलें हें पाहून डॉक्टरांसही आश्चर्य वाटलें. तब्येत साफ सुधारली. इतकेंच नव्हे तर तिचा जन्मापासून असलेला खोकला कायमचा गेला. ही केवळ श्रीबाबांची लीला.

(५) सन १९३० सालीं डहाणूची हवा बिघडल्यामुळें गांवांतील सर्व लोक जवळपासच्या खेड्यांत राहाण्यास गेले होते. तेथील तांदुळाचा मोठा व्यापारी डहाणूपासून ८ । १० मैलांवर असलेल्या स्वतःच्या खेडेगांवीं राहाण्याकरितां गेला होता. मला कांहीं जरूरीच्या कामासाठीं त्याला भेटावयाचें होतें, म्हणून मी ईस्टरच्या रजेंत डहाणूस गेलों. तेथें बाकीचीं कामें आटोपून शेवटच्या दिवशीं त्याला भेटण्याकरितां बैलगाडीनें जाण्यास निघालों. बरोबर दोन गडी होते, परंतु आम्हा कोणालाही त्या गांवचा रस्ता माहित नव्हता. दिवसाची वेळ असल्यामुळें आम्ही रस्त्यानें विचारीत विचारीत चाललों. जातां जातां रात्र पडली, आठ वाजले, मार्ग दिसेनासा झाला. एका ठिकाणीं तीन

रस्ते आले. आतां कोणत्या रस्त्यानें गाडी हांकावी हें कांहीं समजेना. जंगल असल्यामुळें आसपास माणसांची वस्ती नव्हती. त्या वेळीं तेथें परमेश्वराचा धांवा करण्यापलीकडे दुसरा मार्गच नव्हता. आम्ही तेथें अर्धा तास खोटी झालों. मला त्या दिवशींच रात्रीच्या गाडीनें दुसऱ्या दिवशीं ऑफिस असल्यामुळें अंधेरीस परत यावयाचें होतें. अशा वेळीं मी श्रीसाईरूपि परमेश्वराला हांक मारूं लागलों. इतक्यांत ज्या ठिकाणीं मला जावयाचें होतें त्याच सावकाराचा कारकून त्या ठिकाणीं जाण्याकरितां बैलगाडीनें आला. गाडी कोणाची आहे असें त्यास विचारितां त्यानें माझा शब्द ओळखिला आणि मला आपल्या गाडींत घेऊन थेट ठिकाणावर घेऊन गेला. तेथें गेल्यानंतर शेटजींस झालेला प्रकार सांगितला. तो म्हणाला ' माझा कारकून रोज डहाणूस जातो, परंतु इतका उशीर कधींच होत नाहीं. संध्याकाळीं ७ चे सुमारास परत येतो. फक्त आजच त्यास उशीर झाला.' हें ऐकून श्रीबाबांच्या कृपाळूपणाचा व लीलेचा अत्यानंद झाला. श्री बाबांच्या लीलेस अंत नाहीं. हें मीं मागेंच लिहिलें आहे. तर मग मज्यां पामरानें जास्त काय लिहावें. अनुभव सुद्धां लिहिता लिहविती श्री सद्गुरु साई माउलीच आहे.

# श्री सद्गुरु साईनाथ स्तवन

१

छंद मना घे अखंड सद्गुरु साईचरणाचा ।
याविण दुस्तर सागर तरण्या मार्ग नसे साचा ॥ १ ॥

२

तरीच जन्मा येउनि केलें सार्थक देहाचें ।
जरी अहर्निशिं ध्यान लागलें साईनाथांचें ॥
गुरुचरणाची गोडी तुजला किति सांगूं वाचे ।
सेवक किंकर स्वछंदानें गुरुपुढतीं नाचे ॥ १ ॥

३

श्री सद्गुरु बाबासाई । प्रार्थितों माझे आई ॥ गुरुवरा ॥
गुरुवरा ठेवितों डोई । चरणावर आपुल्या साई । खचितचि ॥
खचितची येउनि राही । मम हृदयीं रमेशा साई । निशिदिनी
निशिदिनी धरी प्रेमातें । उद्धरी या दासातें ॥ झडकरी ॥ १ ॥

४

सुखद सुखद नाम आपुलें साईनाथ देवा ।
मूढ जन ताराया धरिली मानव काया ॥
अगणित अज्ञानी जना लावियेले सत्पथाला ।
अवतार कार्य संपवूनि निजधामा त्वरित गेलां ॥१॥

५

श्री साईनाथ दावा परब्रम्ह मातें ।
जननमरण चुकवा मनि हेंचि ध्यातें ।
श्रीरामराय भेटी मन हें भुकेलें ।
श्री साईनाथ देई आपुल्या कृपेनें ॥ १ ॥

श्री बाबांचा दास.

# अनुभव

आंधेरी

तारीख २५-८-३१

श्रीयुत बाबासाहेब तर्खड यांस, कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष:—

आपल्या श्री साईलीलेच्या मासिकांत माझ्या अल्प बुद्धीच्या श्री बाबांच्या दासाचा अनुभव प्रसिद्ध व्हावा म्हणून मी आपणांकडे पाठवीत आहे तरी एखाद्या अंकांत जागा करून छापण्याची कृपा कराल अशी आशा आहे.

आमचे वडील इ. स. १९११ सालीं श्री बाबांची कीर्ति ऐकून श्री क्षेत्र शिर्डी येथें श्री बाबांच्या दर्शनास गेले. पहिल्याच दर्शनी श्री बाबांनीं त्यांना सुमारें एक महिना ठेऊन घेऊन त्यांच्याकडून सेवा करून घेतली. त्यानंतर इ. स. १९१३ सालीं श्री बाबांच्या कृपेनें आमचा सर्व मंडळीसह बिऱ्हाड करण्याचा योग जुळून आला. त्या खेपेस श्री बाबांच्या पादुका देव्हाऱ्यांत पुजण्यास असाव्या म्हणून तयार करवून बरोबर घेतल्या. तेथें गेल्यावर त्या ( पादुका ) श्री बाबांस दाखविल्या. तेव्हां त्या ( पादुका ) श्री बाबांनीं हातांत घेऊन व आमच्या मनांतला हेतु ओळखून त्या ( पादुका ) दोन्हीं पायांच्या आंगठ्यामध्यें धरून " फार छान दिसतात तरी ह्या तुम्हीं घरीं नेऊन देव्हाऱ्यांत पूजा करावी. " म्हणून त्या आम्हांस परत दिल्या. तेव्हांपासून आजतागाईत त्यांची पूजाआरती आम्ही करीत आहोंत.

गेल्या दिपवाळींत धनत्रयोदशीच्या दिवशीं सकाळीं उठतां क्षणींच आम्हीं जों पादुकांचें दर्शन घेण्यास गेलों तों देव्हाऱ्यांत उजव्या पायांतली पादुका नाहीं असें आम्हांला आढळून आलें. व तपासाअंतीं ती कोणीही हालविली नाहीं असें कळून आलें. शेवटीं घरांतलें सर्व सामान काढून पाहिलें

परंतु तिचा पत्ता लागला नाहीं. आम्ही आमच्याकडून शक्य तितका तपास केला, परंतु पत्ता लागला नाहींच. पुढें ती राहिलेली एकच पादुका पुजण्याचा क्रम चालू ठेविला. असें सुमारें दोन महिनेपर्यंत चाललें होतें. मात्र आमच्या मनांतून गेलेल्या पादुकेबद्दल विसर न पडतां मधून मधून इकडे पाहा तिकडे पाहा ही क्रिया चालूच होती. पुढें सुमारें दोन महिन्यांनीं नित्याप्रमाणें सकाळीं उठतां क्षणींच दर्शन घेण्यास जातों तों दुसरीही पादुका जागेवर नाहीं असें आढळून आलें. मात्र रात्रीं आरती करतांना पादुका जागेवर असल्याची आमची सर्वांची खात्री होती. आतां रात्रीं एकाएकीं ह्या पादुका जाव्या कशा ह्याचा विचार करितां हें कृत्य श्री बाबांच्याशिवाय कोणाचें नाहीं अशी आमची घरांतल्या सर्व मंडळीची खात्री होऊन चुकली. व त्या खेपेस आम्हीं तपास न करतां त्यांच्यावरच प्रेमानें आरोप घालून पादुका परत देण्याची प्रार्थना केली. दोन्ही पादुका एकाएकीं गेल्यामुळें श्री बाबांचा कांहीं तरी कोप झाला असें वाटून आम्हां घरांतल्या सर्व मंडळीस फार वाईट वाटलें. परंतु ती करुणामय माऊली भक्तांवर अशी केव्हां कोपते काय ? तर त्या माऊलीच्या मनांतून तिचें आमच्या घरांत प्रत्यक्ष वास्तव्य असल्याची प्रचिती तिला दाखवावयाची होती. परंतु आमच्यासारख्या अज्ञान बालकांस हें कसें कळावें ? तेव्हां ती माउली आमच्यावर कोपली असेंच आम्हांस वाटूं लागलें ह्यांत नवल नाहीं. बरें असो.

पुढें आपल्या नशिबीं श्रीबाबांच्या हातच्या पादुका नाहींत अशा समजुतीनें आम्हीं दुसऱ्या तयार असलेल्या पादुका दुकानांतून आणाव्या म्हणून मी मुंबईस त्या आणण्याकरितां गेलों. परंतु लिहिल्यास कदाचित् आमच्या वाचकांस खरेंही वाटणार नाहीं, मला फिरतां येण्यासारख्या सर्व चांदीच्या दुकानांत पाहाण्याकरितां सुमारें दोन तीन तास फिरलों; परंतु एकाही दुकानांत तयार अशा मिळाल्या नाहींत.एका दुकानांत तर असें उत्तर मिळालें कीं, कालपर्यंत एक जोड होता, परंतु कालच तो जोड एकानें नेला. पुढें आपल्या मिळत नाहीं. असें वाटून आमच्या ओळखीचा असलेल्या सोनाराकडे जाऊन

तयार करवाव्या म्हणून तसाच पुढें सोनाराच्या घरीं गेलों; परंतु त्या माउली-चीच इच्छा नसल्यामुळें त्या सोनाराच्या घराला कुलुप दिसून आलें. आतां मात्र आपल्या माऊलीचा आपणांवर पूर्ण कोप झाला, असें वाटूं लागलें. शेवटीं पादुकां-वाचून श्री बाबांच्या फोटोचीच पूजा करण्याचा क्रम पुढें चालू ठेविला. असे बरोबर नऊ महिने गेले. तेव्हां आमचा पादुकांबद्दल विसर पडत नाहीं असें जाणूनच कीं काय त्या करुणामय माउलीला आमची करुणा येऊन तिनें त्या दोन्हीं पादुका फोटो असलेल्या पाटाखालीं आणून ठेविल्या. हें आम्हांस सकाळीं जेव्हां सारवण्याकरितां पाट काढला तेव्हां ज्या रीतीनें आम्हीं पाटावर ठेवून पुजीत होतों त्याच रीतीनें त्याच पाटाखालीं दिसून आल्या. तेव्हां आम्हांस अत्यानंद वाटून आमच्या करुणामय माऊलीची आमच्या घरांत वास्तव्य अस-ल्याबद्दल आमची पूर्ण खातरी झाली. आतां हें कृत्य श्रीबाबांचें नव्हे तर कोणाचें ? नाहीं तर एकामागून एक अशा दोन महिन्यांच्या अंतरानें त्या जातात काय व नऊ महिन्यांनंतर त्याच पाटाखालीं दोनहीं सारख्या जोडीनें, म्हणजे श्रीक्षेत्र शिर्डी येथें समाधीजवळ ज्या स्थितीमध्यें त्यांच्या पादुका आहेत त्याच स्थितीमध्यें येतात काय ! कदाचित वाचकवृंदांना असा संशय येईल कीं, तो पाट आम्हीं काढला नसेल. तरी श्रीबाबांची जेथें पूजा होते तो पाट रोज काढून सारवण केल्याशिवाय कोण पूजा करणार ? तर हा अनुभव वाचून श्री बाबांचें वास्तव्य असल्याबद्दल सर्व भक्तांची खात्री होईल. कळावें

बाबांच्या चरणाचा दास

**आत्माराम हरिभाऊ चौबळ**

# अनुभव.

लेखकाच्या स्नेह्याकडून कळलेली हकीकतः—

"आगस्ट ता. २० सन १९३१ गुरुवार रोजीं माझ्या मोठ्या नातीला, वय ६ ताप आला. तो १०३ च्या वर चढला. मुलगी मोठी चपळ, परंतु तापाच्या जोरामुळें निपचित पडली होती.

तिच्या आईनें डॉ. कोठारे यांजला बोलावून आणून औषधोपचार केले. कचेरींतून संध्याकाळीं घरीं आल्यावर ही हकीकत मला कळली. यंदाच्या जुलै-ऑगस्ट महिन्यांत जी पावसाची सारखी झोड चालू होती तिच्यामुळें सर्दीचा हा ताप असावा असें वाटलें. आणि त्याप्रमाणें पहांटेस ताप निघून मुलगीही हुषार होऊन नित्याप्रमाणें खेळूं लागली.

शुक्रवार, शनिवार दोन्ही दिवस ताप मुळींच नव्हता. रविवारीं दोन-प्रहरीं थोडी थंडी वाजते ( आणि त्या वेळीं पाऊस पडून हवा विशेष गार झाली होती ) असें सांगून मुलगी पांघरूण आढून झोंपी गेली.

मुलीचा काका डॉक्टर आहे. हे मुंबईस राहातात आणि तेथें त्यांची प्रॅक्टीस आहे. प्रत्यहीं रविवारीं आणि सणावाराच्या दिवशीं आपल्या वडी-लांना व कुटुंबांतील इतर लहानथोरांना भेटण्यासाठीं ते नित्यनेमानें मुंबईहून येत असतात. आणि आम्हां सर्वांबरोबर भोजन करून दोनप्रहरानंतर चहा घेऊन परत मुंबईस जात असत.

ही मुलगी पांघरूण घेऊन निजली आहे हें पाहून जातेसमयीं आम्हां सर्वांना सांगितलें कीं, हिला जरूर ताप येईल. त्याप्रमाणें सायंकाळपासून जरा जरा ताप येऊन तो वाढत जाऊन रात्रीं १०३½ वर गेला.

सकाळीं डॉ. कोठारे यांजला बोलाविलें. मुलीला तपासतां तिच्या घशांत डाव्या Tonsil ( टॉनसिल ) वर एक चण्याच्या डाळी इतका लहान पिंवळा चट्टा दिसला, तो पाहातांक्षणीं डॉक्टरांची चर्या चिंतातुर होऊन ते म्हणाले, " मुलीला आत्ताच्या आतां मुंबईला परळच्या इस्पितळांत नेऊन डॉ.

खानोलकर यांना दाखवा. मला ही Dyptheria ( घाटसर्प ) ची केस दिसते. या रोगावरचें इन्जेक्शन इकडे मिळावयाचें नाहीं. आतां मुळींच विलंब करूं नका. जो क्षण जातो तो अत्यंत अमोलिक आहे. " हें ऐकतां क्षणींच माझीं गात्रें शिथिल झालीं, हातपाय लटपटूं लागले. कारण हा रोग किती भयंकर, हानिकारक आणि सांसर्गिक आहे याचें मला पुस्तकी ज्ञान होतें. या वेळीं सकाळचा नवाचा सुमार होता.

डॉक्टर मुलाला टेलिफोननें ही हकीकत कळविली. तो सुमारें अर्ध्या तासानें मुंबईहून आला.

आल्याबरोबर तशा त्या तापासहित त्या मुलीला चांगली गरम कपड्यांत गुंडाळून तिला आणि तिच्या बापाला बंद मोटारींतून परळच्या इस्पितळांत नेलें.

तिला घरांतून नेण्यापूर्वीं आम्हीं श्री साई माउलीची प्रार्थना करून मुलीच्या कपाळाला थोडी उदी लावली.

इस्पितळांत मुलीचा घसा तपासतांक्षणींच डॉ. खानोलकरांनीं तोंड वाईट केलें आणि म्हणाले तिला ताबडतोब antidyptherial ( डिपथेरिया विरुद्ध ) इन्जेक्शन द्या. जर आम्ही येथें इन्जेक्शन दिलें तर तिला ऑर्थर-रोड इस्पितळांत ( खास सांसर्गिक रोगांकरतां ) न्यावें लागेल. आणखी मुलगी अत्यंत चपळ असल्या कारणानें तेथें आपल्या मायेचें कोणी न दिसल्यामुळें तिच्या मनावर विपरीत परिणाम होऊन ती हैबत घेईल. म्हणून साधेल तर घरींच उपचार करा आणि इतर सर्वांना तिच्यापासून दूर ठेवा.

मुलीला तिच्या बापानें घरीं परत आणली. तिचा काका परळाहून मुंबईस जाऊन दवाखान्यांतून इंजेक्शनें घेऊन आला. त्या वेळीं बाराचा सुमार होता.

घशांतला चट्टा जो भरभर वाढत होता आणि जो उदी लावतांना सुमारें पावलीइतका झाला होता तो तितकाच राहिला.

डॉक्टरांनी इंजेक्शनें वगैरे उपचार सारखे चालू ठेवले आणि श्रीच्या कृपेनें त्या उभयतां डॉक्टरांच्या हाताला यश येऊन तो चट्टा पसरावयाचा राहून तिसऱ्या दिवशीं म्हणजे बुधवारीं सकाळीं गळून पडला. (त्या पदार्थाला पेटलेल्या शेगडींत घालून जाळून टाकिलें.

डॉ. खानोलकरांना ही हकीकत ऐकून आनंद झाला. मुलगी वांचेल याची त्यांना आशा नव्हती.

इतर सर्व मंडळीच्या घशाला दिवसांतून दोन वेळां प्रतिबंधनार्थ औषधें आंतून पुष्कळ दिवस लावण्यांत येत होतीं.

श्री साईबाबांनींच या घोर विवंचनेंतून मुलीसुद्धां आम्हां सर्वांना सुखरूप निभावलें यांत मुळींच शंका नाहीं.

ही हकीकत इतक्या सविस्तर रीतीनें लिहिण्याचें मुख्य कारण हें कीं, वाचकांपैकीं ज्यांचा श्री साईमाउलींवर पूर्ण विश्वास आहे. त्यांना ती दयाळू माउली अशा बिकट प्रसंगांतून अचूक मार्ग कशी दाखवीत असते आणि त्यांचा कशाप्रकारें सांभाळ करीत असते याची साक्षात् जाणीव असावी म्हणून."

वांद्रें,
ता. १ सप्टेंबर १९३१

"म्हातारा"

# संक्रांतीचा हलवा.

सबंध मार्गशीर्ष महिन्यांत येत्या म्हणजे इ. स. १९१५ च्या जाने-वारी महिन्यांत घडणाऱ्या संक्रांतीच्या पवित्र दिवसासाठीं माझ्या स्नेह्याच्या बायकोनें श्रींच्यासाठीं निरनिराळ्या वस्तूंचा म्हणजे बारीक केलेले बदाम, पिस्ते, व लवंगा, वेलच्या आणि उत्तम साफ केलेल्या तिळाचे, साखरेचे अणिदार तिळगुळ म्हणजे हलवा स्वहस्तानें करण्याचा सारखा अविश्रांत सपाटा चालविला होता.

कर्मधर्मसंयोगानें संक्रांतीला लगबग आठ एक दिवस बाकी होते इतक्यांत त्या सर्व जिनसा तयार झाल्या. नंतर तिला फिकीर पडली कीं, आतां कसें करावें ? इतकी मेहनत घेऊन या जिनसा नीट राहावयाच्या कशा ? एखाद दुसरी मुंगी येऊन तिनें स्वाद घेतल्यावर मग कसें ?

बाई याप्रमाणें चिंतातुर झाली. तिनें आपल्या यजमानाला त्याप्रमाणें कळविलें. मित्र धूर्त होता. तो म्हणाला, आपण आजच्या आज टपालांतून हा हलवा शिरडीस रामकृष्णी(राधाकृष्णा)बाईकडे पाठवूं. ती त्याचा संभाळ घेऊन श्रींच्या चरणीं तो हलवा जरूर सादर करील. इतर कोणालाही तसें करण्याची निकड वाटणार नाहीं.

बाईला तें योग्य वाटून त्याच दिवशीं तो हलवा टपालानें पार्सल होऊन रवाना झाला.

त्याच्या दुसरे दिवशीं आरती झाल्यावर श्री न्याहारीसाठीं बसले असतां त्यांनीं राधाकृष्णाबाईकडे निरोप पाठविला कीं, " माझा संक्रांतीचा हलवा पाठवून दे ! " बाई बापडी अत्यंत विवंचनेंत पडली. तिनें तात्याबा मार्फत सांगून पाठविलें कीं, " मालकाला म्हणावें अजून संक्रांतीला आठ दिवस आहेत. " बाबा म्हणाले " तें कांहीं मला समजत नाहीं. माझा संक्रांतीचा हलवा आत्तांच्या आतां पाठवून दे. " सर्वच गोंधळ झाला. कोणाला काय करावें कांहीं सुचेना.

इतक्यांत टपालच्या शिपायानें तो तिळगुळांचा डबा बाईच्या स्वाधीन केला. बाई उघडून पाहाते तों आंत संक्रांतीचा हलवा ! ! तिच्या आनंदाला पार राहिला नाहीं. तसेंच तात्याबाला बोलावून त्याच्या स्वाधीन तो डबा केला व मालकाकडे घेऊन जाण्यास त्याला सांगितलें. त्यानें त्याप्रमाणें तो डबा श्रींच्या स्वाधीन केला. श्रीसाईबाबांनीं तो उघडून त्यांतले चार दाणे तोंडांत टाकले आणि म्हणाले " त्या अवदसेला सांग हा डबा जपून ठेव आणि संक्रांतीच्या दिवशीं पाठवून दे बरं " नंतर श्रीनीं व इतर मंडळींनीं न्याहारीला हात लावला.

श्रीनीं असें कां केलें ? मित्राच्या बायकोला चिंता पडली होती कीं, आपण केलेले तिळगूळ श्रींच्या मुखांत पडण्याअगोदर एखाद्या मुंगीच्या आहारीं पडतील. तसें न व्हावें म्हणून श्रीनीं तो हलवा आपल्या मुखांत घातला.

नंतर संक्रांतीच्या दिवशीं श्रींच्या दरबारांत तो वाटला गेला हें सांगणें नलगे.

सारांश, आपली अशी उत्कट इच्छा व प्रेम असल्यावर ती इच्छा व तें निर्व्याज प्रेम श्री साईबाबा कसें कारणीं लावीत आणि त्याचा तावडतोब दाखला देत आणि त्याप्रमाणें अद्यापीही देत आहेत याचा आपण विचार तरी करितों ? श्रीनीं आपल्या प्रेमाचा मोबदला तावडतोब द्यावा आणि आपण मात्र शंका-कुशंकांनीं व्याप्त राहावें यांत कांहीं हंशील ? अशा अप्रतिम दिव्यदेही पुरुषाचे चरणीं मस्तक नमवून त्यांचा वरदहस्त शिरीं घेऊन, बाह्य भपक्याला भुलून इतरांच्या चरणीं तेंच मस्तक नमवितें तरी कसें याचें राहून राहून सखेदाश्चर्य वाटतें. श्री साईलीलेच्या वाचकवृंदांत तरी असे कोणी अविश्वासयुक्त अंतःपर नसावेत अशी श्रींच्या चरणीं नम्र प्रार्थना आहे.

इतरांना कदाचित् ही हकीकत क्षुल्लक वाटेल. स्नेह्याची बायको देह ठेवून आज पांचसहा वर्षें झालीं तरी स्नेह्याला या गोष्टीची आठवण होतांच त्याचें अंतःकरण भडभडून येतें. कंठ दाटतो. शब्द फुटत नाहीं. गुरु माउ-लीचें काय प्रेम हें. आपण सर्वव्यापि आहोंत याची जाणीव श्रींना नव्हती

काय ? किडी मुंगीमध्यें देखील आपली वस्ती आहे याचे त्यांनीं किती तरी दाखले दिले आहेत. मग एखादी मुंगी तो हलवा खाती तर त्यांत अध्यात्मिक-दृष्ट्या काय गैर झालें असतें ? परंतु सद्गुरु माउलीच ती. तिचें प्रेम कळव-ळून आलें. त्या बाईनें इतकी मेहनत घेऊन अशा उत्कट प्रेमानें गुरु-माउलीसाठीं हलवा केला. मतलब हा कीं, त्याचें सेवन श्रीनींच करावें; त्याचा दाखला तावडतोब देऊन श्रीनीं त्या तिच्या प्रेमाचा असा उघड रीतीनें स्वीकार केला कीं, ज्यामुळें तिच्या व तिच्या यजमानाच्या मनावर आजन्म उत्तम संस्कार होऊन त्यांचीं हृदयें सद्गुरु माऊलीच्या चरणीं जखडून बांधलीं गेलीं आहेत.

ह्याच प्रकार श्री सावित्रीबाई तेंडुलकर यांनीं लेखकाला एके प्रसंगीं निवेदन केला.

एके समयीं बाईंना एका बकुलीच्या झाडाखालीं विपुल फुलें मिळालीं. तीं वायां जातात हें पाहून त्यांनीं दररोज तीं सर्व गोळा करावीं. गृहकृत्यें साधून त्यांतल्या त्यांत त्या सर्व फुलांच्या माळा करून श्रींच्या पूजेच्या तस-बिरीवर चढवाव्या. त्या माळा इतक्या होत कीं, ती सर्व तसबीर बहुतेक झांकली जात असे, असा क्रम सारखा अडीच तीन महिने चालला होता.

त्यानंतर फुलें कमी होऊं लागलीं. त्याच सुमारास श्री सावित्रीबाई आणि त्यांचे यजमान शिरडीस श्रींच्या दर्शनासाठीं गेले. दर्शन होतां क्षणींच दीक्षितांकडे वळून श्री म्हणाले, "अरे काका ! आज दोन तीन महिने मी इकडे शिरडीस होतों कुठें ?" श्री सावित्रीबाईकडे बोट दाखवून "या माझ्या आयेनें मला बकुलीच्या फुलांनीं दडपून टाकलें होतें रे ! अरे मी गुंगून गेलों होतों ! मला माझें भान होतें कुठें ? आतांच जरा हायसें वाटतें !"

काय प्रेम हें ? अशा उत्कट प्रेमाचें वर्णन लेखणीनें करावें तरी कसें ? सद्गुरु सद्गुरु कांहीं वाटेवर लागले नाहींत ! गुरु माउलीचें प्रेम अनिर्वचनीय

आहे. तें ज्यांच्या नशिबीं अनुभवावयाचें आलें ते धन्य होत ! धन्य त्यांची मातापितरें कीं, त्यांना जन्म देऊन त्यांचें कोटकल्याण केलें !

आधुनिक विद्वान आढ्यतेनें बोलतांसा आढळतात "Why should we surrender our individuality to another ? Where is the necessity of a सद्गुरु ? " म्हणजे आम्ही आमचें व्यक्तिगत स्वातंत्र्य दुसऱ्याला अर्पण कां करावें ? सद्गुरूची आवश्यकता कशाला ? अशांना इतकेंच सांगावेंसें वाटतें कीं, सद्गुरु ही कांहीं लहानसहान व्यक्ति नव्हे. सव्वा रुपयानें कान फुंकणारी मूर्ति नव्हे. दांभिक पसारा उभारवून जाळ्यांत पकडणारा मनुष्यरूपि कोळी नव्हे. भगवें वस्त्र परिधान करून, पायांत खडावा घालून, भोळ्याभाबड्या स्त्रियांना फसविणारा मनुष्यरूपि राक्षस नव्हे; क्वचित् प्रसंगीं कर्णपिशाच्च साधन केलेला भोंदू नव्हे. स्पिरिचुआलिझम, क्लेर व्हायन्स वगैरे अत्यंत खालच्या पायरीनें साधनयुक्त मनकवडा ठग नव्हे. तर सद्गुरु माउली तीच कीं, तुमची हृदयग्रंथी उचंबळून, खुलून, प्रभूच्या ठिकाणीं तुमचें निस्सीम प्रेम लावून, तुम्हाला **अभी** करून अत्यंत आनंदाच्या अशा अप्रतिम अवर्णनीय उच्च स्थितिप्रत सहजगत्या घेऊन जाईल. तीच गुरुमाउली. तिच्या प्रेमाची किंमत अमोल आहे. तिची शिकवण अहेतुक, अप्रतिम, अतुलनीय आहे. हें ज्याचें त्यानेंच जाणावयाचें असतें. अशा दिव्य माउलीपुढें आपलें स्वतःचें क्षुद्र व्यक्तिगत मानसिक स्वातंत्र्य स्वेच्छेनें जो कोणी ठेवूं पाहील त्याच्यासारखा कर्मदरिद्री तोच.

# अनुभव

इ. स. १९११ सालीं मी ठाणें येथें नोकरीवर असतांना श्री साईबाबा यांची कीर्ति ऐकिली होती कीं, त्यांस कोणी इसमानें कांहीं नवस किंवा प्रार्थना केली असतां व ती कोठूनही केली असतां पोहोंचते व त्याप्रमाणें ते भक्तास पावतात.

कर्मधर्मसंयोगानें इ. स. १९१२ सालांत माझी स्थिति फार हलाखीची झाली होती. म्हणजे माझी बायको गरोदरपणांत सीक होती. व बाळंत झाल्यावरसुद्धां तिची तबियत सीकच होती. तशांत दोन महिन्यांचा माझा मुलगा बरसातींत सीक होऊन त्यास न्युमोनिया झाला व त्याची जगण्याची आशा नव्हती. नोकरी दगदगीची होती व ह्या खर्चामुळें पगार पुरेनासा झाला होता. त्यामुळें मी रात्रंदिवस चिंतातुर होतों.

इतक्यांत मला श्री साईबाबांची आठवण झाली व मनांत विचार आला आपण त्यांस गाऱ्हाणें घालून पाहावें व त्याप्रमाणें मनांत त्यांची प्रार्थना केली कीं, "परमेश्वरा, मला ह्या संकटांतून पार पाडून चांगले दिवस दाखीव म्हणजे मी तुमच्या दर्शनास येईन." याप्रमाणें मीं त्यांस गाऱ्हाणें घातलें व स्वस्थ मनानें मुलास औषधोपचार वगैरे करीत राहून माझी नोकरी मी बजावीत होतों. पैशासंबंधीं माझ्या मित्रांनीं मला मदत केली. सुमारें ८।१५ दिवस गेल्यानंतर मुलास आराम पडत गेला व बायकोचीही तबियत सुधारली. व आणखी एक महिन्यानें माझी बदली चांगल्या सुखाच्या जागीं होऊन मला चांगले दिवस आले.

नंतर मी इ. स. १९१२ सालांत डिसेंबर महिन्यांत त्यांच्या दर्शनास शिर्डी येथें जाऊन त्यांच्या पायांवर डोकें ठेवलें व अंतःकरणपूर्वक मनांत प्रार्थना केली व त्यांनींही मला "तुझें भलें होईल" असा आशीर्वाद दिला.

रीतीप्रमाणें मी त्यांस दक्षिणा दिली. ती किती दिली याची मला चांगलीशी आठवण नाहीं व त्याच दिवशीं बाबांची आरती वगैरे झाल्यावर मी जेवण आटोपून त्यांचा निरोप घेऊन परत फिरलों.

त्या वेळेपासून मी बाबांचा फोटो आणून घरांत पूजाअर्चा करीत असतों व त्या वेळेपासून माझे दिवस सुखाचे गेले व हल्लीं जात आहेत. बारीक सारीक संकटें हीं संसारी मनुष्याचे मागें लागलेलीं आहेत व त्याप्रमाणें तीं येत असतात; परंतु त्यांचें निरसन तेच करीत असतात असा माझा समज आहे.

त्यानंतर मी दोन वेळां शिरडीस जाऊन आलेलों आहे. माझ्या आठवणीप्रमाणें मी सन १९१७ व १९२४ सालीं जाऊन आलेलों आहें.

हल्लीं मी नोकरीवरून रिटायर झालों असून वसई येथें राहात आहे. या पुढील अनुभव आल्यास लिहून पाठवीन.

मु. वसई.
ता. २-९-३१.

बाबांचा सेवक.
**जनार्दन रामचंद्र दळवी**

**ता. क.** सदर्हूप्रमाणें १९२३ सालीं माझा धाकटा मुलगा तुर्भे येथें नोकरीवर असतांना फार सीक झाला व पुढें तो तिकडे बरा होईना म्हणून वसई येथें आणला व इकडे त्याची चिकित्सा डॉक्टर लोकांनीं केल्यावर टायफॉईड फिवर म्हणून ठरवून औषधोपचार केले व त्यांतून तो मोठ्या शिकस्तीनें म्हणजे निवळ बाबांच्या कृपेनेंच सुधारला व त्या वेळीही माझी बदली चांगल्या ठिकाणीं झाली व त्यामुळें मी १९२४ सालीं मुलांस बरोबर घेऊन शिर्डी येथें श्री साईबाबांच्या समाधीच्या दर्शनास गेलों होतों.

**ज. रा. दळवी.**

पुरुषाचा पुरुषार्थ। किती सांगूं तुजप्रती ॥ ११० ॥ कर्तृत्व करितां अभिमान। व्हावा बापा मनीं जाण। फल येतांचि व्हावें लीन। अभिमान तो झुगारोनि ॥ १११॥ जोंवरी जिवाचें अस्थित्व। तोंवरी त्या जपणें सत्य। मरण घडतां व्यर्थ। शोक त्याचा करूं नये ॥ ११२ ॥ कां कीं शोक करण्या पाहीं। तेथें जागा उरलीच नाहीं। सुज्ञांस न त्याचें वाटे कांहीं। मूर्ख मात्र करिती शोक॥ ११३॥ पहा पांचाची उसनवारी। आणिली होती आजवरी। ती त्यांची त्यांना निर्धारीं। परत केली प्राणानें ॥ ११४ ॥ वायू वायूंत मिळाला। तेज मिळालें तेजाला। ऐसीं आपआपलें ठिकाणाला। गेलीं निघून पंचभूतें ॥ ११५ ॥ शरीर भाग पृथ्वीचा। तो निजसम दृश्य साचा। म्हणोन तो शोक करण्याचा॥ नाहीं विषय शिष्योत्तमा ॥ ११६ ॥ तैसेंच होतां मुलाचें जनन। हर्ष करीं न द्यावें मन। तो सृष्टीचा व्यवहार समजून। स्वस्थ रहावें नारायणा ॥ ११७ ॥ पहा पृथ्वी बीजा धारण करी। घनवृष्टि करिती वरी। मग तो सूर्य आपुल्या करीं। मोडालागीं निपजवितो ॥ ११८ ॥ त्या मोडाचें होतां जनन। पृथ्वी सूर्य आणि घन। काय आनंद मानून। नाचूं लागती दश दिशा ॥ ११९ ॥ त्याचा मोठा वृक्ष होवो। अथवा अजि जळून जावो। परी हर्ष शोक रिघावो। न करी त्यांच्या मानसीं ॥ १२० ॥ तैसें रहावें आपण। मग शोक दुःख कोठून। शोक दुःखाच्या अभावीं जाण। मुक्त स्थिति चांदोरकरा ॥ १२१ ॥ याच्या पुढील जें कां कथन। तें मी पुढें सांगेन। एखादे वेळ तुज लागून। राही सावध निजकर्मीं ॥ १२२ ॥ ऐसी ऐकोनि समर्थ वाणी। चांदोरकर आनंदले मनी। बाबांचे धरिले पाय दोनी। घट्ट मिठी मारूनियां ॥ १२३ ॥ नयनीं लोटल्या अश्रुधारा। रोमांच उठले शरीरा। हे साई समर्थ उदारा। उद्धार माझा

# अध्याय ३३ वा



श्रीगणेशायनमः ॥ तूं त्रिगुणातीत त्रिगुणात्मक । तूं त्रिश्वातीत विश्वव्यापक । तूं सच्चिदानंद वरदायक । सर्वारंभ आद्य तूं ॥ १ ॥ तूं शब्दातें उत्पादिता । शब्दही तूंच समर्था । तुजवेगळें करूं जातां । बोलणें अवघें खुंटतें ॥ २ ॥ तूं मंगलरूप मंगलकर्ता । मग अमंगलाची कशास वार्ता । तुझ्या पदरीं बांधलों असतां । अशिव मातें स्पर्शेना ॥ ३ ॥ असो कांहीं दिवस गेल्यावर । ते बाबांचे शिष्य चांदोरकर । आले दर्शनार्थ साचार । तया शिर्डी ग्रामासी ॥ ४ ॥ करून पदाचें वंदन ॥ बोलते झाले नारायण । बाबा आतां पुढील कथन । मजलागीं कथन करा ॥ ५ ॥ ऐसें ऐकतां शिष्यवचन । बाबा आनंदले पूर्ण । म्हणती आतां अवधान । द्यावें माझिया बोलासी ॥ ६ ॥ सुखदुःखाचिये अंतीं । जरी आहे मुक्तस्थिति । ती स्थिति येण्याप्रती । वागणें कैसें सांगतों तें ॥ ७ ॥ देहप्रारब्ध भोगितां । सदसद्विचारशक्ति सत्ता । जागृत ठेवावी सर्वथा । तिशीं फांटा देऊं नये ॥ ८ ॥ सहज गतीनें जें जें घडे । तें तें देहप्रारब्ध । रोकडें । कर्म करूनी जें जें घडे । तें न देहप्रारब्ध ॥ ९ ॥ पहा कित्येक चोऱ्या करिती । कृतकर्मे शिक्षा भोगिती । हें शिक्षा भोगणें निश्चितीं । नोहे देहप्रारब्ध ॥ १० ॥ जहर पीतां घडे मरण । हें नोव्हे देहप्रारब्ध जाण ! हें कृतीचें फळ पूर्ण । कर्त्यालागीं मिळतसे ॥ ११ ॥ नायनाट करून धन्याचा । कारकून होय मालक साचा । हाही देहप्रारब्धाचा । नोहे भाग शिष्योत्तमा ॥ १२ ॥ मग तो कारकून झाल्या धनी । राहे सदा चैनींनीं । गाड्या घोडे उडवोनी । म्हणे मी सुखी झालों ॥ १३ ॥ त्यानें जो धन्याचा केला घात । तें जोडिलें पाप सत्य । हेंच पुढील जन्माप्रत । संचित क्रियमाण होईल ॥ १४ ॥ संचित क्रियमाणाप्रमाणें । जन्म होईल त्याकारणें । हें जाणती शहाणे । नाहीं काम मूर्खाचें ॥ १५ ॥ शिवाय देहप्रारब्धेंकरून । जें लावलें होतें कार-

कूनपण । तें त्यानें शिल्लक जाण । ठेविलें पुढिले जन्मासी ॥ १६ ॥ एवंच पुढील जन्माची । केली तयारी त्यानें साची । जन्ममरण यात्रा अशाची । कोठून सांग चुकेल ॥ १७ ॥ पहा कितीएक पदवी-धर । आरूढती अधिकारावर । कित्येक हिंडून जगभर । देती नुसतीं व्याख्यानें ॥ १८ ॥ कित्येक योगी होती । कित्येक दुकानें घालिती । कित्येक पोरें पढविती । होऊनी शिक्षक शाळेमध्यें ॥ १९ ॥ योगी शिक्षक दुकानदार । व्याख्याता अधिकारी नर । अवघे आहेत पदवी-धर । प्रयत्न अवघ्यांचा सारखा ॥ २० ॥ हा भिन्न भिन्न व्यवसाय मग । कां व्हावा मशीं सांग । अरे हा देहप्रारब्धयोग । नाहीं फळ प्रयत्नाचें ॥ २१ ॥ ऐसें वदतां गुरुवर । काय बोलती चांदोरकर । चोरी करून होतां चोर । मात्र म्हणावें कर्मफळ ॥ २२ ॥ आणि देहप्रारब्ध येथें मात्र । म्हणावें कां सांगा त्वरीत । हेंही कर्मजन्य फल सत्य । कां बाबा म्हणूं नये ॥ २३ ॥ ऐसें वदतां तो प्रेमळ भक्त । बोलते झाले साईनाथ । तें ऐका हो सावचित्त । श्रोते वेळ दवडूं नका ॥ २४ ॥ हे चांदोरकर कुळभूषणा । महासज्जना नारायणा । ह्या भलत्याच वेड्या कल्पना । काढून मज विचारिसी ॥ २५ ॥ पहा कित्येक खरे चोर । असून सुटती सत्वर । पुरावा न होत त्यांचेवर । हें देहप्रारब्ध तयांचें ॥ २६ ॥ एक चोर तुरुंगांतरीं । एक चोर असूनी सावापरी । मग येथ कृत्यफल निर्धारीं । कोठें गेलें सांग पां ॥२७॥ दोघांचें एक कृत्य । एक सुटे एक शिक्षा भोगित । म्हणोनी आहे कृत्यातीत । देहप्रारब्ध नारायणा ॥ २८ ॥ परि त्या सुटलेल्या चोराचें । पाप न जाय कधीं साचें । तें पुढलीया जन्माचें । होईल सत्य कारण ॥ २९ ॥ म्हणून आतां सांगणें तुशीं । भोगितां देहप्रारब्धाशीं । जागृत ठेवावें नीतीसी । म्हणजे कार्य होईल ॥३०॥ सज्जनांची करणें संगत । बसावें त्यांच्या मंडळीत । दुष्ट दुर्जन अभक्त ।

ह्यांची साउली नसावी ॥ ३१ ॥ अभक्ष्याभक्ष करूं नये। वितंडवादीं पडूं नये। खोटें वचन देऊं नये। कवणासही कदाकाळीं ॥ ३२ ॥ एकदां वचन दिल्यावरी। निमूटपणें खरें करी। वचनभंगीं श्रीहरी। दुरावेल नारायणा ॥ ३३ ॥ काम शरीरीं संचरतां। रमावें स्वस्त्रीशीं सर्वथा। पाहून पराची सुंदर कांता। विकारकरीं न द्यावें मन॥३४॥ काम शुद्ध स्वस्त्रीशीं। परि सदा न सेवी तयासी। कामलोलूप मानवासी। मुक्ति मिळणें अशक्य ॥३५॥ हा काम मोठा रे खंबीर। न होऊं देत चित्त स्थिर। षड्रिपूंत याचा जोर। सर्वांहून आगळा ॥ ३६ ॥ ह्मणून ठेवून प्रमाण। करावें कामाचें सेवन। विवेकाचें लोढणें जाण। कंठीं त्याच्या बांधावें ॥ ३७ ॥ कामास वागवावें आज्ञेंत। आपण न जावें त्याच्या कह्यांत। ऐसें जो वागे सत्य। तोच सुज्ञ समजावा ॥ ३८ ॥ देहप्रारब्ध भोगण्याप्रत। षड्रिपूंची जेवढी गरज सत्य। तितुक्यापुरता तयाप्रत। मान द्यावा शिष्योत्तमा ॥ ३९ ॥ हरिनामाचा लोभ धरी। अनीतीविषयीं क्रोध वरी। आशा मोक्षाची अंतरीं। मोह व्हावा परमार्थाचा ॥ ४० ॥ दुष्कृत्यांचा करी मत्सर। भक्तिभावें परमेश्वर। आपला करी साचार। जागा मदा देऊं नको ॥ ४१ ॥ सत्पुरुषांच्या ऐकणें कथा। चित्ताची ठेवी शुद्धता। मान राखणें ज्ञानवंता। आपुल्या जनकजननीचा ॥ ४२ ॥ सहस्र तीर्थांचे ठिकाणीं। एक मानावी निज जननी। पिता आराध्य दैवत ह्मणूनी। वंदन त्याचें करावें ॥ ४३ ॥ आपुले जे कां सहोदर। प्रेम ठेवी तयांवर। भगिनींना अंतर। शक्ति असल्या देऊं नको ॥ ४४ ॥ पत्नीस प्रेमें वागवावें। परि स्त्रैण कदा न व्हावें। तिचें अनुमोदन घ्यावें। फक्त गृहकार्यांत ॥ ४५ ॥ आपुल्या पुत्रस्नुषेंत। विपट पाडूं नये सत्य। तीं असतां एकांतांत तेथें आपण जाऊं नये ॥ ४६ ॥ अपत्यासी न थट्टा करणें। तीं

मित्रांचीं लक्षणें। नौकरासी न सलगी करणें। कन्याविक्रय करूं नको ॥ ४७ ॥ द्रव्य अथवा पाहून वतन। जठरास न करीं कन्यादान। असावा जामात सुलक्षण। कन्येस आपुल्या शोभेलसा ॥ ४८ ॥ हे पुरुषधर्म कथिले तुशीं। ऐसा जो वागे तयाशीं। बद्धस्थिति न बाधे विवशी। सदाचारीं वर्तल्या ॥ ४९ ॥ निज पतीची करणें सेवा। हा स्त्रियांचा धर्म बरवा। तोच त्यांनीं आदरावा। अन्य धर्म नसे त्यां ॥ ५० ॥ पती हाच स्त्रीचा देव। तोच तिचा पंढरीराव। पतीपदीं शुद्ध भाव। ठेवूनी रहावें आनंदें ॥ ५१ ॥ पतीकोपीं नम्रता धरी। प्रपंचांत साह्य करी। तीच होय धन्य नारी। गृहलक्ष्मी जाणावी ॥ ५२ ॥ ठेवूनी पतीशीं दुःश्चित। जी आचरे नानाव्रत। ती पापिणी कुलटा सत्य। तोंड तिचें पाहूं नये ॥ ५३ ॥ स्त्रियांनीं विनय सोडूं नये। छछोर चाळे करूं नये। परपुरुषाशीं बोलूं नये। कोणी नसतां त्या ठायीं ॥ ५४ ॥ जरी आपुला सहोदर। तरी तो पुरुष आहे पर। म्हणुनी त्याशीं साचार। एकांत स्त्रीनें करूं नये ॥ ५५ ॥ या स्त्रीदेहाची विचित्र स्थिती। तो अनीतीचा भक्ष्य निश्चितीं। ह्मणून सावधगिरी अती। ठेविली पाहिजे शिष्योत्तमा ॥ ५६ ॥ शेळी भक्ष्य लांडग्याचें। ह्मणून तिला कुंपण साचें। करूनी ठेविती कांट्यांचें। रक्षण तिचें करावया ॥ ५७ ॥ तोच आहे न्याय येथें। स्त्रीदेहरूप शेळीतें। तीव्र व्रत कुंपणातें। बांधून रक्षण करावें ॥ ५८ ॥ पती सकाम पाहूनि। तत्पर रहावें स्त्रियांनीं। लहान मुलांच्या संगोपनीं। दक्ष फार असावें ॥ ५९ ॥ मुलें आपुलीं सन्मार्गरत। होतील ऐसें शिक्षण सत्य। देणें आपुल्या मुलांप्रत। नानागोष्टी सांगोनी ॥ ६० ॥ सासू श्वशुर दीर जावा। यांचा द्वेश न करावा। सवत असल्या प्रेमभावा। तिच्याविषयीं धरणें मनी ॥ ६१ ॥ चारचौघांनीं गुण ध्यावे। ऐसें वर्तन असावें। पत्याज्ञेनें

आचरावें । व्रत एखादें आलया मनीं ॥ ६२ ॥ पूर्व पापें करून । भर्ता झालिया गतप्राण । कडकडीत ब्रह्मचर्य धरून । आयुष्य आपुलें कंठावें ॥ ६३ ॥ वैधव्य नशिबीं आल्यावरी । न पहुडिजे मृदु शय्येवरी । सौगंधित उटया शरीरीं । कदा आपुल्या करूं नये ॥ ६४ ॥ नक्त हविष्यान्न शाकाव्रत । एकादश्यादि उपवास सत्य । आचरोनी जगन्नाथ । हृदयसंपुटीं सांठवावा ॥ ६५ ॥ जेणें होय कामोद्दीपन । ऐसें न कदा सेवणें अन्न । सदा अध्यात्मनिरूपण । ऐकत जावें विधवांनीं ॥६६॥ आत्मानात्म विचार करणें । संन्यस्तापरि राहणें । देवतार्चन भक्तीनें । करून पुराणें वाचावीं ॥ ६७ ॥ ही साधारण पुरुषस्त्रीनीति । कथन केली तुजप्रती । ऐसें वागतां बद्धस्थिती । अनायासें होय दूर ॥ ६८ ॥ आतां बद्धस्थितीचीं लक्षणें । सांगतों मी तुजकारणें । तिकडे आपुलें अवधान देणें । करूनी मन एकाग्र ॥ ६९ ॥ धर्माधर्म जाणेना । ईश्वर कोण हें ओळखेना । मनीं न उपजे सद्वासना । त्याशीं बद्ध म्हणावें ॥ ७० ॥ जो केवळ कपटपटू । ज्याचें वचन सदा कटू । ज्याचीं पापें अचाटू । तोही बद्ध जाणावा ॥ ७१ ॥ साधुसंत सज्जन । यांतें नोळखी ज्याचें मन । प्रपंचीं जो तल्लीन । तोही बद्ध जाणावा ॥ ७२ ॥ दानधर्मीं न ज्याची मती । पोकळ वितंडवादी अती । तोही बद्ध निश्चितीं । शिष्योत्तमा जाणावा ॥ ७३ ॥ परांच्या ठेवा बुडवीत असे । आपला सवरात करीत असे । साधुसंतां निंदीतसे । तोही बद्ध जाणावा ॥ ७४ ॥ आपुली वाढविण्या थोरी । उगीच दुसऱ्यांची निंदा करी । सोंग साधूचें घेऊन वरी । करी अनीति तो बद्ध ॥ ७५ ॥ प्रपंच ज्याचा परमार्थ । प्रपंच ज्याचा पुरुषार्थ । सदा प्रपंचीं ज्याचें चित्त । तोही बद्ध जाणावा ॥ ७६ ॥ जो मित्राचा द्रोह करी । जो गुरुशीं वैर धरी । विश्वास महा वाक्यावरी । ज्याचा नसे तो बद्ध ॥ ७७ ॥

नाना ग्रंथ भाराभर। करूनिया पाठांतर। ज्याचें न होय शुद्ध अंतर। तोही बद्ध जाणावा ॥ ७८ ॥ बद्धासी न मिळे सद्गती। बद्धासी न घडे सत्संगती। तो जाय यमलोकाप्रति। यातना अमित भोगावया ॥ ७९ ॥ आतां मुमुक्षुलक्षण। करितों मी तुज कथन। तीं करावीं तुवां श्रवण। सद्भाव ठेवूनियां ॥ ८० ॥ जो बद्धस्थितीस कंटाळला। जाणे सदसद्विचाराला। ह्मणे कधीं भेटेल मला। देव तो मुमुक्षु ॥ ८१ ॥ सत्संगाची करी आस। निःसार मानी जगतास। जो विटला प्रपंचास। तो मुमुक्षु जाणावा ॥ ८२ ॥ देहप्रारब्धें जी स्थिती। प्राप्त झाली तयाप्रती। त्यांतची मानी चित्तीं। समाधान तो मुमुक्षु ॥ ८३ ॥ जयाशीं पाप करण्याचें। वाटतसे भय साचें। असत्य न बोले कदां वाचे। तो मुमुक्षु जाणावा ॥ ८४ ॥ कृत-कर्मांचा पश्चात्ताप। ज्यास झाला असेल सत्य। तो जरी असला पतीत। तरी तो मुमुक्षु जाणावा ॥८५॥ देवाविषयीं ज्यास आस्था। साधूंचे ठायीं नम्रता। जो नीतीचा असे भोक्ता। तो मुमुक्षु जाणावा ॥ ८६ ॥ जो क्षणेक सत्संग सोडीना। ज्याची अखंड रतली रसना। श्रीहरीच्या नामीं जाणा। तो साधक ह्मणावा ॥८७॥ विष वाटे विषय ज्यासी। जो अध्यात्मविद्येसी। साधावया प्रति-दिवशीं। यत्न करी तो साधक बा ॥ ८८ ॥ जो ध्यान करी ईश्व-राचें। ग्रहण करून एकांताचें। त्यानें पद साधकाचें। घेतलें ऐसें ह्मणावें ॥ ८९ ॥ जो हरीचे गुणानुवाद। ऐकतां मानी आनंद। कंठ होतसे सद्गद। तो साधक ह्मणावा ॥ ९० ॥ लौकिकाची न करितां पर्वा। करी सदा संतसेवा। चित्तांतून रमाधवा। जाऊं न दे तो साधक ॥ ९१ ॥ निंदा स्तुती ज्या समान। तैसाच माना-पमान। जन आणि जनार्दन। एक जया सिद्ध तो ॥ ९२ ॥ षड्रि-पूंचे विकार। ज्यासीं न होती तिळभर। संकल्प निमाले साचार।

# In the Court of the District Judge,

At Ahmednagar.

Civil Suit No. 135 of 1921. Exh. 11

Pleaders.

R. B. CHITALE and K. P. BHALERAO.

1. Govind Raghunath Dabholker of Vandre;
2. Laxman Ganesh Mahajani of Bombay.........Plaintiffs.

**Against.**

No. 1 in person.

1. Vishwanath Lahanau Nazir Dist. Court, Nagar;
2. Purushotum Sakharam of Shirdi died after institution of suit.
3. Tatya Ganpati Koli of Shirdi.........Defendants. Claim—Rs. 5500/-

Reading predecessor's orders dated August 18 August 8th, 1919, October 17th, 1919 and December 12th 1919 which state the facts out of which this suit arises.

The suit has been brought accordingly under section 92 of the Code of Civil Procedure for the approval of a scheme for the administration of the Shirdi Sansthan of Sai Baba. A scheme (Exh.A) has been submitted and has been approved subject to certain corrections I accept the scheme and direct that it be only brought into force by that Committee named in the scheme. The temporary arrangement made by my predecessor is cancelled. The surviving trustee— the Nazir — will hand over the charge to the new trustees in whom the propperty specified in the schedule (a) will henceforth vest.

No application has been made to me for costs. Such application may, if necessary be made later.

Sd/— C. V. VERNON,